नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०६/२०२६ (सोमवार )

## स्फोटके नियम २००८ मध्ये सुधारणेसाठी राज्य शासन केंद्राला प्रस्ताव सादर करणार;
## जीवितहानी टाळण्यासाठी स्वयंचलित यंत्रणेवर भर मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर मा पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी केले सादरीकरण

नागपूर जिल्ह्यात मागील अडीच वर्षात स्फोटकांच्या कंपन्यांमधील अपघातांमध्ये जीवितहानीच्या घटना लक्षात घेता स्फोटके नियम २००८ मध्ये सुधारणा सुचविणारा प्रस्ताव राज्य शासन केंद्राला सादर करणार आहे. या प्रस्तावाच्या मसुद्यात जीवितहानी टाळण्यासाठी कंपन्यांमध्ये स्वयंचलित प्रक्रियेसह सुरक्षेशी संबंधित जागतिक मानकांचा अवलंब करण्याच्या शिफारसी सुचविण्यात आल्या आहेत.

दिनांक ०७/०६/२०२६ रोजी रामगिरी येथे मा. ना. श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या नेतृत्वाखालील अभ्यासगटाने या मसुद्याचे सादरीकरण केले. यात राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे तज्ज्ञ तसेच स्फोटके निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधींचा प्रामुख्याने समावेश होता. अभ्यासगटाने प्रस्तावाच्या मसुद्यात अनेक शिफारसी सुचविल्या आहेत. त्यात प्रामुख्याने स्फोटकांच्या निर्मिती प्रक्रियेतील जोखीम कमी करण्यासाठी ती जास्तीत जास्त प्रमाणात स्वयंचलित करण्यात यावी व त्यासाठी रोबोट्सचा वापर करावा, प्रत्यक्ष जोखमीच्या प्रक्रियेच्या जागी कमीतकमी मनुष्यबळ उपस्थित राहील, हे सुनिश्चित करावे, तसेच त्यासाठी सुरक्षेशी संबंधित जागतिक मानकांचा आधार घेण्यात यावा,

या प्रमुख शिफारसींचा समावेश आहे. या शिफारसींना अनुसरून स्फोटके नियम २००८ मध्ये सुधारणा प्रस्तावित केल्या जाणार आहेत.

मा.ना. श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर जिल्ह्यातील स्फोटकांच्या कंपन्यांमधील अपघातांच्या घटनांची अत्यंत गंभीर दखल घेऊन स्फोटकांशी संबंधित नियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्याचे सूतोवाच केले होते. याअनुषंगाने अभ्यास करण्याच्या सूचना त्यांनी  मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांना दिल्या होत्या. त्यानंतर पोलिस अधीक्षकांच्या नेतृत्वातील अभ्यासगटाने यासंदर्भात विविध घटकांशी चर्चा करून नियमातील प्रस्तावित सुधारणांचा एक मसुदा तयार केला आहे. या प्रस्तावित मसुद्याचे सादरीकरण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर करण्यात आले.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सादरीकरण केले. यावेळी अभ्यास गटाचे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे संचालक श्री ए.आर. सोनटक्के, सहाय्यक संचालक श्री गगन उपाध्याय आणि कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २० लाख २९ हजारांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०७/०६/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सावरगाव ते वडचिचोली रोडवर उमरी शिवी नरखेड येथे नाकाबंदी केली असता संशयित १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४०/बी एल ३१०२ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक नसिफ अजगर शेख, वय २०**

**वर्ष, रा. तिनखेडा ले आउट हा मिळुन आला.** आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे असलेल्या परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक **अल्लाउद्दीन मुस्तफा शेख, वय ३६ वर्ष, रा. भारसिंगी** अशी माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४०/बी एल ३१०२ किंमती २०,००,०००/— रूपये आणि ५.८० ब्रास रेती किंमती २९,०००/— रूपये असा एकुण किमती २०,२९०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं २०२३, सहकलम ६६(१), १२९(ए), २०७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०८/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, भिवापूर येथे भुदान रोडवर कॅनलच्या बाजूला एका लिंबाच्या झाडाजवळ काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) दिपक नत्थुजी नंदेश्वर, वय ४२ वर्ष, रा. सिद्धांत नगर, भिवापूर, जि. नागपूर २) जालींदर हरीचंद्र ढोक, वय ३६ वर्ष, रा. सिद्धार्थ नगर, भिवापूर ता. भिवापूर ३) विराज गेडाम, रा. सिद्धार्थ नगर, भिवापूर, जि. नागपूर यांना जागीच पकडले. ०३ आरोपी घटनास्थळाहुन पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ६७०/—रूपये, ०१ ॲडरॉईड मोबाईल असा एकुण १०,६७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दाखल प्राणांतिक अपघातातील अनोळखी मृत व्यक्ती ओळख पटविणे बाबत माहीती

**पोलीस स्टेशन रामटेक**:— पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दिनांक २१/०५/२०२६ रोजी तुमसर ते रामटेक रोड, तिडके कॉलेज समोर झालेल्या प्राणांतिक अपघाताच्या गुन्हयात एका अनोळखी पुरुषाचा मृत्यू झालेला असून सदर मृत व्यक्तीची ओळख अद्याप पावेतो पटलेली नाही. सदर प्रकरणी अप क्रमांक ४८९/२०२६ अन्वये गुन्हा नोंद आहे.

**मृतकाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे**

**पुरुष, वय अंदाजे ६० वर्षे,रंग सावळा, उंची अंदाजे ५.३ फूट, बांधा सडपातळ,डोक्यावरील व दाढी—मिशीचे केस काळे—पांढरे व वाढलेले, अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्यांचा मळकट शर्ट,निळ्या रंगाची नाईट पॅन्ट, वरील वर्णनाचा इसम कोणाच्या ओळखीचा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही माहिती असल्यास पोलीस स्टेशन रामटेक येथे तात्काळ संपर्क साधावा.**

**संपर्क क्रमांक**

**१) पोलीस स्टेशन रामटेक :— ०७११४—२५५०७८**

**२) पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात :— ८६९१९००१००**

# महा मेट्रो रेल्वे फेस—२ चे काम सुरू असल्याने रात्री ००:०१ ते सकाळी ०६:०० पर्यंत बुटीबोरी ते नागपूर कडे जाणारी सर्व वाहतुक बंद करून येणारी जाणारी वाहतुक एकेरी मार्गाने वळविल्याबाबत...

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीत** महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमीटेड, नागपूर यांचे तर्फे महा मेट्रो रेल्वे फेस—२ चे काम सुरू असून पिलर क्र. ३०७ ते ३१२ मधील अंतर १५५ मिटर तसेच पिलर क्र. ३७२ ते ३७७ मधील अंतर १२५ मिटर पिलरचे काम करण्यात येणार आहे. सदरचा पिलर हा नॅशनल हायवे क्र. ३६१ येथील आहे. बुटीबोरी कडून नागपूरकडे जाणारी वाहतूक आणि नागपूर कडून बुटीबोरीकडे येणारे वाहतूक ही पिलर क्र. ३०७ ते ३१२ तसेच पिलर क्र. ३७२ ते ३७७ मधील दरम्यानची वाहतुक दिनांक १०/०६/२०२६ रोजी पासुन दररोज रात्री ००.०१ ते सकाळी ०६.०० वा. या वेळेत वळविणे आवश्यक आहे. **रस्त्यावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवू नये तसेच रोडवर गंभीर व प्राणांकित अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा तसेच सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा व वाहतुक सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये दिनांक १०/०६/२०२६ रोजी पासुन ते काम पुर्ण होईपर्यंत वाहतुक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- सुतगिरणी फाटया जवळील पिलर क्र. ३०७ ते ३१२ दरम्यान रात्री ००.०१ ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत बुटीबोरी ते नागपूरकडे जाणारी सर्व वाहतुक बंद करून नागपूर कडून बुटीबोरीकडे येणारी तसेच बुटीबोरीकडुन नागपुर कडे जाणारी वाहतुक एकेरी मार्गाने वळविण्यात येत आहे.

- सातगाव फाटया जवळील पिलर क्र. ३७२ ते ३७७ दरम्यान रात्री ००.०१ ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत बुटीबोरी ते नागपूरकडे जाणारी सर्व वाहतुक बंद करून नागपूर कडून बुटीबोरीकडे येणारी तसेच बुटीबोरीकडुन नागपुर कडे जाणारी वाहतुक एकेरी मार्गाने वळविण्यात येत आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक ०७/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन बोरी, एमआयडीसी बोरी, वडोदा पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे विनोद मधुजी उईके, वय ४४ वर्ष, रा. तुमडी वार्ड क्र. ०२, तालुका जिल्हा नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे** महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी रविंद्र रामभाऊ प्रगट, वय ४५ वर्ष, रा. वडोदा, ता. कामठी, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ७२० मिली देशी दारू, १० लिटर मोहाफुल दारू असा एकुण १४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने